ISBN : 978-81-969179-9-9

# "75 YEARS OF INDIAN ECONOMY : OPPORTUNITIES AND PROBLEMS"




**Published By**

**ARTS, COMMERCE, SCIENCE AND COMPUTER SCIENCE COLLEGE ASHVI KD.**

**NAAC Accredited: B++ grade with CGPA 2.89**

Tal. Sangamner, Dist. Ahmednagar Maharashtra, India- 413738

Tel: +02425-240051, Email ID: principal.acsashvi@pravara.in,

Website: www.ashvicollege.in

ISBN : 978-81-969179-9-9


| Sr. No. | Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 53 | महाराष्ट्राच्या आर्थिकसामाजिक विकासात विविध विकास - महामंडळांच्या योजनांची भूमिका | किरण शिवाजी घोलप, सुहास आल्हाड | 203 |
| 54 | भारतातील कृषी क्षेत्राच्या समस्या आणि उपाययोजननांचा अभ्यास. | नीलिमा ऋषिकेश खर्डे, रंजना अनिल दिघे | 207 |
| 55 | भारताचा ग्रामीण विकास | प्रविण बबनराव आहेर | 210 |
| 56 | भारतातील बँकिंग क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या कार्य-ताण स्थितीबाबतचे संकल्पनात्मक अध्ययन | प्रशांत बाळकृष्ण शेळके | 214 |
| 57 | भीमा नदीवरून उपसा जलसिंचन करणाऱ्या दौंड तालुक्यातील शेतकऱ्यांचा सामाजिक व आर्थिक अभ्यास | लोंढे सिद्धार्थ सुखदेव मोरे भीमराव पांडुरंग | 219 |
| 58 | कृषी पर्यटन – व्यवसाय संधी | नितीन अशोक मुटकुळे, वैशाली दिनकर कानवडे. | 225 |
| 59 | डॉबाबासाहेब आंबेडकरांचे अस्पृश्यता निर्मूलनविषयक विचार . | काटकांबळे नामदेव तुकाराम | 229 |
| 60 | ग्रामीण कादंबरीतून व्यक्त होणारे आर्थिक पर्यावरण | सुवर्णा राजेश जाधव | 232 |
| 61 | औद्योगिक वित्तपुरवठा आणि मोठया उद्योगाची सद्य: स्थिती | जीशेंडगे .एल . उषा कारभारी अहिरे | 236 |
| 62 | अहमदनगर व औरंगाबाद जिल्ह्यातील मानव विकास " -सन२०१२) "निर्देशांकाचे विवेचन१३ ते २०१७(१८- | कानवडे अर्चना रामनाथ कैलास अर्जुनराव ठोंबरे | 241 |
| 63 | पर्यटन आणि आर्थिक विकास | जांगीड संगीता रामेश्वरलाल | 246 |
| 64 | बालकामगार एक जागतिक समस्या | शैलेश संजय नळे | 248 |
| 65 | मराठी ग्रामीण साहित्याचे जनक : महात्मा ज्योतिबा फुले | राजपुत सुनिल ए. | 250 |
| 66 | ग्रामीण विकासात धरणाच्या पाण्याचे व्यवस्थापन आणि वापराची भूमिकाअहमदनगर जिल्हा विशेष संदर्भ - | गणेश शेषराव शेळके कृष्णा विठ्ठल कोकरे | 253 |
| 67 | औद्योगिकीकरणाचे अत्याधुनिकीकरण भारतात बनवा - | संभाजी भाऊराव काळे दिगांबर ज्ञानदेव नलगे | 256 |
| 68 | भारतातील दारिद्र्य समस्या आणि योजना | माधवी अशोकराव मोरे सुमित रमेश पुलाटे | 261 |
| 69 | भारतातील कृषी क्षेत्राच्या समस्या आणि उपाययोजना | एन. एस .मांढरे. | 265 |
| 70 | शेतमजुरांची कमतरताशेती क्षेत्रातील समस्या : | खैरनार मनोहर बबन | 269 |
| 71 | डिजिटल मार्केटिंग | निलेश भास्कर दळवी | 272 |
| 72 | महिला स्वयंसहायता बचत गटांचा ग्रामीण विकासातील " "योगदानाचा अभ्यास | मोरे भीमराव पांडुरंग पाचपुते पौर्णिमा तुकाराम | 274 |
| 73 | "महाराष्ट्रातील साखर उद्योगाची सद्य: स्थिती" | सुप्रिया आनंद कदम. | 277 |
| 74 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना | छत्रे दत्तात्रय पांडुरंग, आशा एसपाटील. | 281 |
| 75 | प्राचीन भारतातील पर्यटनाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम | अनाप एस. ए . | 284 |
| 76 | 'गोदान' उपन्यास में चित्रित भारतीय किसान जीवन | दिपाली दत्तात्रय तांबे | 287 |
| 77 | किसानो की समस्याओं का मूल्यांकन :हिंदी उपन्यास साहित्य संदर्भ में | गणेश चिमाजी खेमनर | 290 |
| 78 | मराठी साहित्यातून चित्रित होणारा ग्रामीण विकास | निलेश सोमनाथ पर्वत | 292 |


AnyScanner

ISBN : 978-81-969179-9-9

# पर्यटन आणि आर्थिक विकास


## डॉ.जांगीड संगीता रामेश्वरलाल

नूतन कला महाविद्यालय राजापूर


**प्रस्तावना :** निसर्गाच्या सहवासात आनंदाचे क्षण घालविण्याची आणि नवनवीन कला, संस्कृतीविषयी जाणून घेण्याची माणसाची मुलभूत प्रवृत्ती पर्यटनाचा मूळ आधार आहे. धार्मिक आणि ऐतिहासिक पर्यटनाला तेवढेच महत्व आहे. आज वेगवान दळणवळणाच्या साधनाने जग जवळ आले असताना देशाबरोबरच बाहेरचे जग जाणून घेण्याच्या माणसाच्या ओढीने हे क्षेत्र सातत्याने विस्तारतआहे.

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेत पर्यटनाची भूमिका महत्वाची आहे पर्यटन हे आर्थिक विकास आणि रोजगारनिर्मितीचे सक्षम माध्यम मानले जाते. पर्यटन क्षेत्र हे देशातील सर्वोच्च सेवा उद्योगांपैकी एक आहे. आजच्या काळात अर्थव्यवस्था मजबूत करणे ही प्रत्येक देशाची पहिली गरज आहे. आज जगात अनेक देशांची अर्थव्यवस्था पर्यटन उद्योगाभोवती फिरते. भारताच्या जीडीपीमध्ये पर्यटन क्षेत्राचा ६.२३ टक्के वाटा आहे तर एकूण रोजगारामध्ये ते ८.७८ टक्के योगदान देते. २०२२ मध्ये सुमारे ६२ लाख परदेशी पर्यटकांनी भारताला भेट दिली. देशातील पर्यटनाला चालना देण्यासाठी शासनाने पर्यटन धोरण २०२३ तयार केले असून त्याला भरभरून प्रतिसाद मिळाला आहे. २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्यात पर्यटन उद्योगाचा विकास मोठी भूमिका बजावेल.

**संशोधन विषयाची उदिष्ट्ये :**

1) पर्यटनाची संकल्पना अभ्यासणे
2) पर्यटनाचे महत्व अभ्यासणे
3) पर्यटनामुळे होणारा आर्थिक विकास अभ्यासणे
4) पर्यटनाच्या विकासासाठी उपाययोजना सुचविणे

**पर्यटनव्याख्या :**

एका व्यक्तीने किंवा व्यक्ती समूहाने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी मनोरंजनासाठी, अभ्यासासाठी, कामासाठी केलेला प्रवास म्हणजे पर्यटन होय. मनोरंजन, फुरसत किंवा कामासाठी केलेला प्रवास म्हणजेच पर्यटन. जागतिक पर्यटन संस्था (World Tourism Organization

**पर्यटनाचे महत्त्व -**

1) **आर्थिक प्रगती** - पर्यटन उद्योगमुळे परकीय मुद्रेचा साठा करण्यात मदत मिळते.त्यामुळे आपल्या देशाला परकीय चलन उत्पन्न करण्यास मदत मिळते.दरवर्षी मोठ्या संख्येने पर्यटक भारत आणि इतर ठिकाणांना भेट देतात.ते वेगवेगळ्या ठिकाणी जातात तेथे राहतात आणि तिथल्या दुकानात खरेदी करतात.या सर्व गोष्टी परदेशी मुद्रेसाठी किंवा चलनासाठी महत्त्वपूर्ण योगदान देते.वैश्विक मंदी असून देखील पर्यटनामध्ये टक्केवारी वाढ झाली आहे.

2) **उत्पन्नाचा स्त्रोत** - पर्यटन हे सार्वजनिक आणि खाजगी उत्पन्नाचे निरंतर स्त्रोत आहे. सरकारने विविध प्रकारचे कर लावले आहे याला सरकारी महसूल म्हणतात या करांद्वारे मिळविलेले उत्पन्न हे सार्वजनिक उत्पन्न आहे.जे विक्रेता स्थानिक वस्तुंनी नफा मिळवतो त्याला वैयक्तिक उत्पन्न म्हणतात.पर्यटन रोजगार निर्मित मध्ये देखील मदत करतो. यामुळे हॉटेल उद्योग,आतिथ्य उद्योग,सेवा क्षेत्र ,करमणूक,आणि परिवहन उद्योगात रोजगाराची संधी मिळाली.

3) **पायाभूत सुविधांचा विकास** - आपण कधी या कडे लक्ष दिले आहे का की,एखाद्या ठिकाणाला जेव्हा पर्यटन स्थळ घोषित केले जाते तेव्हा त्या ठिकाणचे लक्षणीय परिवर्तन होते.पर्यटन हे धरणं,रस्ते, कनेक्टिव्हिटी, विमानतळ सुधारणे आणि पर्यटकांना एखाद्या ठिकाणी चांगल्या प्रकारे भेट देण्यास मदत करते .या मुळे पर्यटनाचा इन्फ्रास्ट्रक्चर चा विकास होण्यास मदत मिळते.

4) **सामाजिक प्रगती** - सांस्कृतिक देवाणघेवाण करण्यासाठी पर्यटन हा एक उत्तम मार्ग आहे. हे नवीन प्रगतीपथावर भेट देताना पर्यटक एकमेकांना आदर, सहिष्णुता आणि प्रेम दर्शविणे शिकवते त्यामुळे हे सामाजिक प्रगतीस प्रोत्साहित करते.

5) **सांस्कृतिक वारसा-** पर्यटन आपल्या देशातील सौंदर्य, कला, इतिहास आणि संस्कृती दर्शविण्यास मदत करते.कोणत्याही देशातून येणारे वेगवेगळे लोक त्यांच्या सह सुंदर आणि सांस्कृतिक संकल्पना घेऊन येतात.आणि त्या संकल्पना वेगवेगळ्या ठिकाणी पसरवतात.अशा प्रकारे स्थानिक कौशल्यता,भाषा आणि कलेला पर्यटनामुळे वाव मिळतो.आणि सांस्कृतिक वारसा जपला जातो.

**पर्यटन आणि आर्थिक विकास**

पर्यटनाला सर्व जगात अगदी प्राचीन काळापासून महत्त्व दिले गेले आहे. अगदी १५व्या, १६व्या शतकात भारत बघायला आलेल्या अनेक दर्यावर्दी पर्यटकांची माहिती आपण इतिहासात वाचलेली आहे. हे पर्यटक जरी व्यापारी संधी शोधण्याकरिता किंवा व्यापार वाढवण्याकरिता आले असले तरी त्यामध्ये भारत देश कसा आहे, इथले लोक कसे आहेत हे बघण्याचे आकर्षण हे देखील त्यामागचे एक कारण होते. आपल्या भारतात अनेक कथांतून तीर्थयात्रेचे संदर्भ दिसून येतात. अगदी अलीकडच्या काळातही तीर्थयात्रा केल्या जातात. यामागे मुख्य उद्देश जरी देवदर्शन हा असला तरी त्यानिमित्ताने केल्या जाणाऱ्या पर्यटनाचा उपयोग नवीन स्थळे, ठिकाणे पाहण्याकरिताही होतो. पर्यटनाचे आकर्षण हे नवीन नक्कीच नाही. भारतातील देवस्थाने बघितली तर असे

AnyScanner

ISBN : 978-81-969179-9-9

दिसून येईल आणि असे म्हणता येईल की लोकांना पर्यटनासाठी प्रोत्साहित करण्यासाठी चांगल्या अशा पर्यटनाच्या ठिकाणी मुद्दाम देवालये, तीर्थस्थाने बांधली गेली आणि देवदर्शनाच्या निमित्ताने लोकांचे पर्यटन घडले आणि घडते.मुळात कोणत्याही देशाला आणि त्याच्या अर्थव्यवस्थेला पर्यटन आणि पर्यटक हे नेहमीच हवेहवेसे वाटतात. पर्यटकांमुळे आणि त्यांच्या पर्यटनामुळे अनेक रोजगार उत्पन्न होतात. देशातील हस्तकला, पारंपरिक कलाकुसर, व्यापार यांना चालना मिळते, उत्पन्न मिळते. आतिथ्य उद्योगाला ग्राहक मिळतात. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे देशाला परकीय चलन मिळते जे भारतासारख्या देशाला खूप महत्त्वाचे आहे. त्यामुळे पर्यटनक्षेत्राला मागणी भरपूर आहे आणि जो ही मागणी योग्य रीतीने शोषण करेल त्याला या व्यवसायात लाभही भरपूर आहे असे म्हणता येईल. भारतात पर्यटनाच्या अफाट संधी आहेत. बर्फाच्छादित पर्वतांपासून ते महासागरात पसरलेल्या बेटांपर्यंत. पर्यटन क्षेत्र विविधतेने नटलेले आहे. भारताला समृद्ध सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा आहे. त्यामुळेच पर्यटन उद्योग नवीन अवकाश शोधत आहे. या उद्योगात खासगी क्षेत्राचा ८० टक्के सहभाग आहे, मात्र या अनुकूल वातावरणाबरोबरच सुरक्षा, दक्षता, वाहतूक व्यवस्था आणि स्वस्त वाहतूक सुविधाही आवश्यक आहेत. यासाठी नवीन विचार घेऊन पुढे जाण्याची गरज आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारे पर्यटन उद्योगाची व्याप्ती वाढवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत.

**पर्यटन विकासासाठी उपाययोजना**

1) पर्यटनाला चालना देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने या दिशन प्रभावी पाऊले उचलण्यासाठी आवश्यकता आहे. भारतात निसर्गसौंदर्य, ऐतिहासिक वस्तू, वारसा, संस्कृती, खाद्य संस्कृती, तीर्थक्षेत्र या सर्वातील विविधता हयात मोठ्या प्रमाणात पर्यटन क्षमता आहे. पर्यटनाला उपयुक्त वावी भारतात पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत केवळ ते आकर्षक पद्धतीने ग्राहकासमोर मांडण्याची आवश्यकता आहे.

2) पर्यटनाचे नियोजन करणे, परदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी त्याना सुविधा उपलब्ध करणे, त्यांना संरक्षण देणे तसेच विद्यार्थ्यांना संशोधन करण्याकरिता विशेष सवलती देणे. परिणामतः निरनिराळ्या जाती, धर्म, भाषा, चालीरीती, सांस्कृतिक विविधता असलल्या भारतासारख्या देशात पर्यटन हा राष्ट्रीय एकात्मता साथध्याचे प्रभावी साधन ठरेल

3) पर्यटन व्यवसायाच्या विकासात स्त्रियांची भूमिकाई महत्वपूर्ण आहे हणून पर्यटनाचा विकास झाल्यास स्त्रियांनाही रोजगाराच्या अनक संधी उपलब्ध होतील. त्यातून त्याना आर्थिक उत्पन्न मिळविता येवून स्त्रियांचे आर्थिक सश्रमीकरण होवू शकेल. थोडक्यात, पर्यटन व्यवसायातून देशाचा विकास साधतामा स्त्री नबन्नीकरणान्न देखील में क्या प्रमाणावर हातभार लागेल भारत हा खेड्यांचा देश आहे तातील ६५ टक्के जनता ही खड्यात राहत सोबतच भारत भौगोलिकदृष्ट्या संपन्न, प्रथा,

4) परंपरा, संस्कृती, आदरातीथ्य व सुत्र अजा ग्रामीण नकला देना आदा न्हणूनच पर्यटनाच्या संदर्भात ग्रामीण पर्यटन ही संकल्पना उदयास आली. एवढेच नव्हे तर ग्राम भागातील पल्टन हा नवीन उदयान्मुख असा मोठा उपक्रम ठरु शकतो. ज्यामुळे ग्रामीण जनतेला आर्थिक व सामाजिक लाभ प्राप्त होऊ शकतील ग्रामीण कृषी पर्यटनाचा विकास केल्यास पर्यटकासाठी एक नवीन दालन निर्माण होऊ शकतील. ग्रामीण व कृर्ण पर्यटनाचा विकास होवून राज्य व शेतकरी या दोन्हीच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा घडून येईल.

5) निसर्गात असणाऱ्या विविध ओषधी की ज्या विविध आजारावर वापरता येतात अशा नैसर्गिक औषधाची निर्मिती करुन त्याबद्दलची माहिती जर पर्यटकांना करून देण्यात आली तर अशा वनस्पतीच ह्त्पादन मोठ्या प्रमाणावर वाढून रोजगारात वाढ करता येईल

**संदर्भ सूची :**

1) पर्यटन भूगोल -नागतोंडे डॉ. पी. एम., प्रा. पारधी
2 पर्यटन भूगोल- शिंद डॉ. एस. बी.
3) योजना म २०१५.
4) भारतातील पर्यटन उद्योग एक आर्थिक अध्ययन- डॉ.प्रा प्रज्ञा बागडे
5) इंटरनेट, दैनिक व मासिके



Loknete Dr. Balasaheb Vikhe Patil (Padma Bhushan Awardee)
Pravara Rural Education Society`s

# Arts, Commerce, Science and Computer Science College Ashvi Kd.

NAAC Accredited B++(CGPA-2.89), Affiliated to Savitribai Phule Pune University, Pune



National Seminar

On

## "75 Years of Indian Economy: Opportunities and Problems"

Sponsored by

Indian Council of Social Science Research (ICSSR)

Indian Council of Social Science Research

# Certificate

*This is to certify that ~~Mr.~~/~~Mrs.~~/Dr./~~Prof.~~* Sangita R Jangid *of* Nutan Art's College, Rajapur *has actively participated/ /worked as ~~Resource Person~~/ Presented paper entitled:* Tourism & Economic Development. *in the National Seminar on "75 Years of Indian Economy: Opportunities and Problems" organized by Department of Economics, held on 19th & 20th January 2024.*

| Dr. S.S. Rohamare | Mr. G.R. Shelke | Dr. S. R. Jadhav | Dr. M.N. Kharde |
|---|---|---|---|
| Co-ordinator | Canvener | I/C Principal | Campus Director |

SCAN AnyScanner